आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१९ मार्च २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना उद्या जारी होणार, महाराष्ट्रातल्या पाच मतदारसंघांचा समावेश
- नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या अंमलबजावणीला स्थगिती द्यायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार
- घड्याळ हे पक्षचिन्ह वापरण्याची बाब न्यायप्रविष्ट असल्याचं प्रत्येकवेळी स्पष्ट करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे अजित पवार यांना आदेश
- गडचिरोली जिल्ह्यात कोलामार्का जंगलात झालेल्या पोलीस चकमकीत चार नक्षलवादी ठार

**आणि**

- देशातले शेअर बाजार जानेवारीपासूनच्या नीचांकी पातळीवर, सेन्सेक्समध्ये ७३६ अंकांची घसरण

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना उद्या जारी होणार आहे. पहिल्या टप्प्यात १९ एप्रिलला १७ राज्य आणि चार केंद्रशासित प्रदेशातल्या १०२ जागांसाठी मतदान होणार आहे, यामध्ये महाराष्ट्रातल्या रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, आणि चंद्रपूर या पाच मतदारसंघांचा समावेश आहे.

याशिवाय तामिळनाडुमधल्या ३९, राजस्थान १२, उत्तर प्रदेश आठ, मध्य प्रदेश सहा, उत्तराखंड आणि आसाममधल्या प्रत्येकी पाच, बिहार चार, पश्चिम बंगाल तीन, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालयमध्ये प्रत्येकी दोन, तर छत्तीसगढ,

मिझोराम, नागालँड, सिक्कीम, त्रिपुरा, अंदमान आणि निकोबार, जम्मू काश्मीर, लक्षद्विप आणि पुदुच्चेरी इथल्या प्रत्येकी एका जागेचा समावेश आहे.

<><><><><>

सीएए अर्थात, नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या अंमलबजावणीला स्थगिती द्यायला सर्वोच्च न्यायालयानं नकार दिला आहे. हा कायदा लागू करण्याची अधिसूचना गेल्या आठवड्यात जारी झाल्यानंतर याला आव्हान देणाऱ्या २३७ याचिका न्यायालयात दाखल झाल्या. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनजंय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे बी पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या पीठानं आज सुनावणी घेतली. या याचिकांवर तीन आठवड्यात उत्तर देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं सरकारला दिले आहेत. याप्रकरणी पुढची सुनावणी येत्या ९ एप्रिलला होईल.

<><><><><>

प्रधानमंत्री तसंच भाजपाचे जेष्ठ नेते नरेंद्र मोदी आज केरळमधल्या पलक्कड इथं राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या प्रचार मोहिमेचा भाग असलेल्या रोड शो मध्ये सहभागी झाले होते. लोकसभा निवडणूका जाहीर झाल्यानंतर प्रधानमंत्र्यांची केरळमधली ही पहिलीच प्रचार मोहीम आहे.

या रोड शो नंतर प्रधानमंत्री तामिळनाडूमधे सालेमला रवाना झाले. तिथं त्यांची जाहीर सभा झाली. तामिळनाडूमधे पट्टली मक्कलकच्छी या पक्षाशी जागावाटप झाल्यामुळे राष्ट्रीय लोकशाही आघाडीला नवीन उर्जा मिळाली आहे, असं मोदी यांनी या सभेत सांगितलं.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीसाठी भाजपानं तामिळनाडूमध्ये पट्टली मक्कल कच्छी या पक्षासोबत युती केली आहे. दोन्ही पक्षात झालेल्या सहमतीनुसार पीएमके १० जागा लढवणार आहे. या करारावर थायलापूरम इथं पीएमके चे संस्थापक एस. रामदास, पक्षाचे अध्यक्ष अंबुमणी रामदास, आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष के अन्नामलै यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

**<><><><><>**

घड्याळ हे पक्षचिन्ह वापरताना हे चिन्ह वापरण्याचं प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचं प्रत्येकवेळी स्पष्ट करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं आज अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला दिले. प्रत्येक जाहिरात, व्हिडीओ किंवा इतर ठिकाणी, हे लिहिण्याचे आदेश न्यायालयानं दिले. तसंच मराठी, हिंदी आणि इंग्रजी वृत्तपत्रात यासंदर्भातलं निवेदन प्रसिद्धीला द्यायचे निर्देशही न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठानं दिले.

त्याचवेळी लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष हे नाव, आणि तुतारी हे पक्षचिन्ह वापरण्याची मुभा न्यायालयानं दिली आहे. निवडणूक आयोगानं राज्यसभा निवडणुकीपुरतं हे पक्षाचं नाव आणि पक्षचिन्ह वापरण्याची मुभा शरद पवार यांना दिली होती. या निकालाला शरद पवार यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. त्यावर आज झालेल्या सुनावणीत न्यायालयानं हे आदेश दिले. तुतारी हे चिन्ह शरद पवार यांच्या पक्षाव्यतिरीक्त इतर कुणालाही न देण्याचे आदेशही न्यायालयानं निवडणूक आयोगाला दिले.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या संदर्भात मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी आज सकाळी नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांची

भेट घेतली. यासंदर्भात सकारात्मक चर्चा झाली असून काही दिवसात पुन्हा एक बैठक होईल आणि त्यानंतर निर्णय जाहीर होईल, अशी माहिती मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी दिली. मनसेनं किती जागा मागितल्या याविषयी अधिक माहिती द्यायला त्यांनी नकार दिला मात्र पक्षानं आदेश दिला त्या जागेवरुन निवडणूक लढायला तयार असल्याचं ते म्हणाले.

राज ठाकरे महायुतीमध्ये सहभागी झाले तर त्यांचं स्वागत आहे, अशी प्रतिक्रिया भाजपाच्या अनेक नेत्यांनी दिली आहे.

**<><><><><>**

गडचिरोलीत अहेरी तालुक्यातल्या रेपनपल्लीजवळच्या कोलामार्का जंगलात आज पहाटे झालेल्या पोलीस चकमकीत चार नक्षलवादी ठार झाले. यापैकी एकजण नक्षलांच्या तेलंगणा विभागीय समितीचा सचिव तर दुसरा क्षेत्र सचिव होता. दोघांवर ३६ लाखाचे बक्षीस होतं. पोलिसांनी त्यांच्याकडची पिस्तूलं, कार्बाईन आणि इतर, साहित्य ताब्यात घेतलं आहे. या परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र केल्याची माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली.

**<><><><><>**

अमेरिकन फेडरल रिझर्व्ह व्याजदराचा निर्णय जाहीर करणार असल्याच्या पार्श्वभूमीवर देशातल्या शेअर बाजारात आज मोठी घसरण झाली. त्यामुळं जानेवारीपासूनच्या निचांकी पातळीवर शेअर बाजारातले निर्देशांक पोहोचले. सेन्सेक्स ७३६ अंकांनी घसरुन ७२ हजार १२ अंकांवर स्थिरावला तर निफ्टी २३८ अंकांनी घसरुन २१ हजार ८१७ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

सैन्य दलाच्या वैद्यकीय सेवा विभागाच्या पुणे आणि लखनौ इथल्या कमांड रुग्णालयांना २०२२ च्या प्रथम आणि द्वितीय क्रमांकाच्या रक्षा मंत्री पदकानं गौरवण्यात आलं आहे. ही पदकं सैन्य दलाच्या वैद्यकीय सेवा विभागाचे महासंचालक, ज्येष्ठ कर्नल दलजित सिंग यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं प्रदान करण्यात आली. सैन्य दलाच्या वैद्यकीय सेवा विभागानं आव्हानात्मक परिस्थितीतही सुसज्ज असावं असं दलजित सिंग यांनी या पुरस्कार प्रदान सोहळ्याप्रसंगी सुचवलं.

**<><><><><>**

हरयाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांनी आज त्यांच्या मंत्रिमंडळाचा विस्तार केला. यावेळी १ कॅबिनेटमंत्री आणि ७ राज्यमंत्र्यांचा मंत्रिमंडळात समावेश कसरण्यात आला. हरयाणाचे राज्यपाल बंदारु दत्तात्रेय यांनी चंदिगढ इथं राजभवनात नव्या मंत्र्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली.

**<><><><><>**

काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीनं आज पक्षाच्या जाहीरनाम्यावर चर्चा केली. या जाहीरनाम्यात शेतकरी, युवक, महिला, कष्टकरी आणि आरक्षण या मुद्द्यांवर भर दिला जाईल, असं पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी म्हटलं आहे. जाहीरनाम्याच्यासंदर्भात पूर्ण निर्णय घेण्याचे अधिकार कार्यकारिणीनं खर्गे यांना दिल्याची माहिती राष्ट्रीय सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी दिली.

नवी दिल्लीत झालेल्या या बैठकीत माजी अध्यक्ष सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियंका गांधी, पी. चिदंबरम यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेते सहभागी झाले होते.

**<><><><><>**

नवी दिल्लीतल्या प्रगती मैदानावर स्टार्टअप महाकुंभमध्ये दोन हजारांहून अधिक स्टार्टअप्स आणि एक हजारहून अधिक गुंतवणूकदार सहभागी झाले आहेत. देशभरातील स्टार्टअप्सनी विकसित केलेली नाविन्यपूर्ण उत्पादने आणि सेवांचे प्रदर्शन हे या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण आहे. या महाकुंभ मध्ये १० विविध संकल्पनांवर स्टॉल्स उभारले आहेत. यात कृत्रिम बुद्धिमत्ता, कृषी तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, औषध निर्माण, हवामान तंत्रज्ञान, Fintech, Gaming E-Sports, मॅन्युफॅक्चरिंग इनक्यूबेटर्सवर आदी तंत्रज्ञानाचा समावेश आहे. या महाकुंभाची सांगता उद्या होणार आहे.

<><><><><>

भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिनानिमित्त मुंबई भाजपानं येत्या ६ एप्रिलला ४०० कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. मुंबई भाजपा कोअर कमिटीची बैठक आज रंग शारदा इथं झाली. त्यानंतर मुंबई भाजपाचे अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांनी बातमीदारांना ही माहिती दिली. महायुतीचे मुंबईतले सहाही उमेदवार मोठ्या मताधिक्यानं निवडून आणण्यासाठी आवश्यक ते कार्यक्रम राबवण्यासाठीची चर्चा या बैठकीत झाल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

केरळमधल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या श्रीनिवासन या कार्यकर्त्याच्या हत्येप्रकरणी मुख्य आरोपीला राष्ट्रीय तपास संस्थेनं अटक केली आहे. शफीक असं त्याचं नाव असून, पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या प्रतिबंधित संघटनेचा तो सदस्य आहे. १६ एप्रिल २०२२ ला पलक्कड इथं श्रीनिवासन यांची हत्या झाली. तेव्हापासून शफीक फरार होता.

<><><><><>

मद्य अबकारी कर धोरणप्रकरणी अटकेत असलेले आपचे नेते मनिष सिसोदिया यांच्या न्यायालयीन कोठडीत दिल्लीच्या रॉस अवेन्यू न्यायालयानं  ६ एप्रिलपर्यंत वाढ केली आहे. या प्रकरणी फेब्रुवारी २०२३ मध्ये सिसोदिया यांना केंद्रीय अन्वेषण ब्युरोने अटक केलं होतं.

**<><><><><>**

लोकसभा निवडणूक निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भय आणि मुक्त वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीनं निवडणूक आयोगाच्या नियमावलीचं काटेकोर पालन सर्व संबंधितांकडून केलं जावं, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी सर्तक राहावं, अशा सूचना महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिल्या आहेत. ते आज मंत्रालयात ईएसएमएस ॲप संदर्भात आयोजित बैठकीत बोलत होते.

**//<><><><><>//**